पृक्र १९/प

आर.के.सभरवाल आणि इतर विरुध्द पंजाब राज्य प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या अनुषंगाने आरक्षणाबाबतचे आदेश

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय,क्रमांक : बीसीसी-१०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १८ ऑक्टोबर,१९९७.

## शासन निर्णय

सर्वोच्च न्यायालयाने आर.के.सभरवाल आणि इतर विरुध्द पंजाब राज्य, यांच्या प्रकरणी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने असा निर्णय घेतला होता की, केंद्र शासनाने किंवा इतर राज्य शासनांनी आदेश निर्गमित केल्यानंतर, शासन त्याप्रमाणे आदेश निर्गमित करील.

२. केंद्र शासनाने त्यांच्या ज्ञापन क्रमांक ३६०१२/२/९६-इएसटीटी(आरईएस), दिनांक २ जुलै,१९९७ अन्वये वरील याचिकेसंदर्भातील मार्गदर्शक तत्वासंबंधीचे आदेश निर्गमित केलेले आहेत. ते विचारात घेऊन, सेवाभरती व बिंदुनामावलीसंदर्भात, शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे :-

(१) आरक्षण हे संवर्गाच्या पदसंख्येस (संवर्गातील एकूण पदांची संख्या विचारात घेऊन टक्केवारीनुसार) लावावे. रिक्त होणाऱ्या जागांच्या संदर्भात लावू नये. बिंदुनामावली ही आरक्षणाची विहित टक्केवारी पूर्ण होईपर्यन्त वापरात ठेवावी. विहित टक्केवारी पूर्ण होताच बिंदुनामावली वापरण्याची आवश्यकता नाही. त्यानंतर ज्या प्रवर्गाची जागा रिक्त होईल त्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांव्दारे ती जागा भरण्यात यावी व त्या बिंदुपुढे तो बिंदु त्या प्रवर्गासाठी उपयोगात आणला अशी नोंद घ्यावी.

(२) गुणवत्तेवर नियुक्त झालेल्या मागासवर्गीय कर्मचाऱ्याची आरक्षण पदावर गणना करण्यात येऊ नये व त्याची नियुक्ती आरक्षण बिंदुवर दर्शवू नये. त्याची गणना खुल्या प्रवर्गात करावी.

(३) वर (१) येथे नमूद केल्यानुसार बिंदुनामावली ही रिक्त होणाऱ्या पदावर आधारित नसावी. ती संवर्गाच्या संख्येवर आधारित असावी.

(४) बिंदुनामावली ही मागासवर्ग प्रवर्गाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी आहे. ज्येष्ठता निश्चित करण्यासाठी नाही.

(५) बिंदुनामावली वापरताना खालील मुलभूत तत्वे विचारात घ्यावीत --

(१) मागास प्रवर्गांना विहित केलेले आरक्षण हे टक्केवारीनुसार असावे व एकूण आरक्षण हे प्रचलित आरक्षणानुसार संवर्गाच्या ५२% पेक्षा जास्त असता कामा नये.

(२) सरळ सेवा भरतीसाठी आणि पदोन्नतीसाठी वेगळी बिंदु नामावली ठेवावी. या व्यतिरिक्त अन्य भरती माध्यम असल्यास, त्यासाठी देखील वेगळी बिंदुनामावली ठेवावी.

(६) बदली, प्रतिनियुक्तीच्या पदांना बिंदुनामावली वापरु नये.

(७) "मागासवर्गीयांना सेवेत आरक्षण व इतर सवलती" या पुस्तिकेतील प्रकरण १(अ) २ पृ.१८/१९ यातील आदेश विचारात घेऊन छोटया संवर्गाचे गट करण्यात यावेत.

(८) एकाकी पदास बिंदुनामावलीनुसार आळीपाळीने आरक्षण ठेवावे. सुरुवातीस अनुसूचित जाती व त्यानंतर खुला असे आळीपाळीने (एका आड एक) या तत्वावर याचे पालन व्हावे.

(९) यापुढे पदोन्नतीमध्ये भटक्या जमाती (क), धनगर व तत्सम यांना ३.५% व भटक्या जमाती (ड), वंजारी व तत्सम यांना २% आरक्षण विहित करण्यात येत आहे. नवीन १०० बिंदुनामावली सोबत जोडलेली आहे. ती १९९६-९७ च्या निवड सूची पासून अंमलात आणावी आणि तसे करताना बिंदु क्रमांक १ पासून ती

वापरावी. हे आरक्षण त्या त्या निवडसूची वर्षापुरते राहील. तसेच ते "अ", "ब", "क" व "ड" या प्रवर्गात अंतर्गत परिवर्तनीय (Internally Transferrable) राहील.

३. वरील आदेशानुसार बिंदुनामावलीचा वापर करण्यासंबंधीच्या सविस्तर सूचना सोबतच्या परिशिष्टात नमूद करण्यात आल्या आहेत. हे आदेश दिनांक २ जुलै,१९९७ पासून अंमलात येतील. त्यापूर्वी, तयार करण्यात आलेल्या निवडसूच्या अंतिम करण्यात आल्या असल्यास, त्यांत बदल करण्याची आवश्यकता नाही. यापुढे सरळ सेवा भरती किंवा पदोन्नतीचे प्रस्ताव विचारात घेताना, त्या त्या संवर्गातील आरक्षित पदधारकांची संख्या विचारात घेऊन कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रवि भू.बुध्दिराजा,
प्रधान सचिव (सेवा)

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव/उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक,लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई,
सचिव, सर्व प्रादेशिक निवड मंडळे,
सचिव,राज्य निवड मंडळ,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
संचालक, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

* पत्राने.

## प रि शि ष्ट

## बिंदुनामावलीचा वापर करण्यासंबंधीच्या सूचना

(१) सरळसेवा भरती करिता शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-१०९७/प्र.क्र.२/१६-ब, दिनांक २९ मार्च,१९९७ नुसार विहित केलेली १०० बिंदुनामावली वापरण्यात यावी.

(२) सेवा प्रवेश नियमांनुसार प्रत्येक भरती माध्यमाकरिता (सरळसेवा व पदोन्नती इत्यादी) वेगवेगळी बिंदुनामावली दर्शविण्यात यावी. बिंदुनामावलीचा वापर करताना सेवा भरती नियमांतील तरतुदी विचारात घ्याव्यात.

(३) बिंदुनामावली ही मागास प्रवर्गाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी आहे. ज्येष्ठता निश्चित करण्यासाठी नाही.

(४) सध्या असलेली संवर्गातील पदसंख्या लक्षात घेऊन आरक्षण बिंदु निश्चित करण्यात यावेत.भविष्यात संवर्ग संख्येत वाढ झाल्यास, अथवा घट झाल्यास, आरक्षण बिंदुची संख्या त्यानुसार त्या प्रमाणात जास्त अथवा कमी करण्यात यावी.

(५) जेथे सध्या विहित आरक्षणापेक्षा जास्त नियुक्त्या करण्यात आल्या आहेत त्यामुळे सध्याच्या तेथील नियुक्त्यांना बाधा येणार नाही.

(६) सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी यानुसार तातडीने कार्यवाही करुन प्रत्येक संवर्गाबाबत वरील मार्गदर्शक सूचनेनुसार आढावा घ्यावा व त्यानुसार कार्यवाही करावी.

(७) सध्या अस्तित्वात असलेले विविध शासन आदेश वरीलप्रमाणे सुधारण्यात आले असल्याचे गृहित धरण्यात यावे.

(८) पदोन्नतीच्या वाटयातील पदे भरण्यासाठी निवडसूची बनविताना आणि पदोन्नतीच्या वाटयाबाहेरील अन्य पदांवर तात्पुरत्या पदोन्नत्या देण्यासाठी पदोन्नती सूची बनविताना दोन वेगवेगळया बिंदुनामावल्या वापराव्यात.

एच-996(1000-1-03)2

## पदोन्नतीची १०० बिंदु नमुनेवजा नामावली

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनु.जाती | २६ | खुला | ५१ | अनु.जाती | ७६ | खुला |
| २ | अनु.जमाती | २७ | अनु.जाती | ५२ | खुला | ७७ | भ.ज.(ड) |
| ३ | वि.जा.(अ) | २८ | खुला | ५३ | अनु.जमाती | ७८ | खुला |
| ४ | भ.ज.(क) | २९ | खुला | ५४ | खुला | ७९ | खुला |
| ५ | खुला | ३० | खुला | ५५ | खुला | ८० | खुला |
| ६ | खुला | ३१ | भ.ज.(क) | ५६ | खुला | ८१ | अनु.जाती |
| ७ | भ.ज.(ब) | ३२ | खुला | ५७ | भ.ज.(क) | ८२ | खुला |
| ८ | खुला | ३३ | अनु.जमाती | ५८ | खुला | ८३ | वि.जा.(अ) |
| ९ | खुला | ३४ | खुला | ५९ | खुला | ८४ | खुला |
| १० | खुला | ३५ | खुला | ६० | खुला | ८५ | खुला |
| ११ | भ.ज.(ड) | ३६ | खुला | ६१ | अनु.जाती | ८६ | खुला |
| १२ | अनु.जाती | ३७ | अनु.जाती | ६२ | खुला | ८७ | वि.मा.प्र. |
| १३ | खुला | ३८ | खुला | ६३ | अनु.जमाती | ८८ | खुला |
| १४ | खुला | ३९ | खुला | ६४ | खुला | ८९ | खुला |
| १५ | वि.मा.प्र. | ४० | खुला | ६५ | खुला | ९० | खुला |
| १६ | खुला | ४१ | वि.जा.(अ) | ६६ | खुला | ९१ | अनु.जाती |
| १७ | खुला | ४२ | खुला | ६७ | अनु.जाती | ९२ | खुला |
| १८ | खुला | ४३ | अनु.जाती | ६८ | खुला | ९३ | अनु.जमाती |
| १९ | खुला | ४४ | खुला | ६९ | खुला | ९४ | खुला |
| २० | खुला | ४५ | खुला | ७० | खुला | ९५ | खुला |
| २१ | अनु.जाती | ४६ | खुला | ७१ | अनु.जमाती | ९६ | खुला |
| २२ | खुला | ४७ | भ.ज.(ब) | ७२ | खुला | ९७ | अनु.जाती |
| २३ | अनु.जमाती | ४८ | खुला | ७३ | अनु.जाती | ९८ | खुला |
| २४ | खुला | ४९ | खुला | ७४ | खुला | ९९ | भ.ज.(ब/क) (आळीपाळीने) |
| २५ | खुला | ५० | खुला | ७५ | खुला | १०० | खुला |

| | | | |
|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | (१३) | : | १, १२, २१, २७, ३७, ४३, ५१, ६१, ६७, ७३, ८१, ९१, ९७ |
| अनुसूचित जमाती | (७) | : | २, २३, ३३, ५३, ६३, ७१, ९३ |
| विशेष मागास प्रवर्ग | (२) | : | १५, ८७ |
| विमुक्त जाती (अ) | (३) | : | ३, ४१, ८३ |
| भटक्या जमाती (ब) | (२) | : | ७, ४७ |
| भटक्या जमाती (क) | (३) | : | ४, ३१, ५७ |
| भटक्या जमाती (ब/क) | (१) | : | ९९ |
| भटक्या जमाती (ड) | (२) | : | ११, ७७ |
| सर्वसाधारण | (६७) | : | ५, ६, ८, ९, १०, १३, १४, १६, १७, १८, १९, २०, २२, २४, २५, २६, २८, २९, ३०, ३२, ३४, ३५, ३६, ३८, ३९, ४०, ४२, ४४, ४५, ४६, ४८, ४९, ५०, ५२, ५४, ५५, ५६, ५८, ५९, ६०, ६२, ६४, ६५, ६६, ६८, ६९, ७०, ७२, ७४, ७५, ७६, ७८, ७९, ८०, ८२, ८४, ८५, ८६, ८८, ८९, ९०, ९२, ९४, ९५, ९६, ९८, १००. |